# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

# 'मानवंदना' पुस्तक प्रेरणादायी-पाटणकर

वार्ताहर
पाटण

आजच्या युवापिढीने वाचनाची आवड जोपासली पाहिजे. वाचनाने जीवनाचे वेगवेगळे पैलू घडू शकतात. ग्रंथपाल संजय इंगवले यांनी लिहिलेले 'मानवंदना' पुस्तक वाचनीय व प्रेरणा देणारे असल्याचे प्रतिपादन कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी शिक्षण संस्थेचे अमरसिंह पाटणकर यांनी केले.

ग्रंथपाल संजय इंगवले लिखित 'मानवंदना' पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विक्रमबाबा पाटणकर, ग्रंथालयाचे माजी अध्यक्ष विलासराव क्षीरसागर, ज्येष्ठ पत्रकार ए. व्ही. देशपांडे, प्रा. डी. डी. थोरात, दीपकसिंह पाटणकर, धैर्यशील पाटणकर, पोलीस उपनिरीक्षक एस. एस. राऊत,विकास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.



पाटण : मानवंदना पुस्तक प्रकाशनप्रसंगी अमरसिंह पाटणकर, विलासराव क्षीरसागर, ए. व्ही. देशपांडे, विकास शिंदे, एस. एस. राऊत, संजय इंगवले.

विलासराव क्षीरसागर म्हणाले, ग्रंथपाल संजय इंगवले यांनी प्रामाणिकपणे ग्रंथालयात काम केले आहे. संस्था वाढवण्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे.

ए. व्ही. देशपांडे दीपकसिंह पाटणकर, ग्रंथपाल संजय इंगवले, आनंदराव भोळे, मनोहर यादव, जयवंत घाटगे यांनी मनोगत व्यक्त केले. वाचनालयाचे अध्यक्ष चंद्रहार निकम यांनी आभार मानले.

यावेळी प्राचार्य डॉ. एस. डी. पवार, प्रा. बी. एन. पाटील, अशोकराव देवकांत, यशवंतराव जगताप, चंद्रकांत मोरे, गोरख नारकर, नगरसेवक राजेंद्र राऊत, स्वप्नील माने, ॲड. सौरभ देशपांडे, व्ही. जी. पवार, शिलादेवी पाटणकर, शोभा कदम, एकनाथराव थोरात, राजाभाऊ कांबळे, यांच्यासह वाचनालयाचे संचालक मंडळ, विविध क्षेत्रातील मान्यवर, ग्रंथप्रेमी नागरिक, महिला उपस्थित होते.